'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-I *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Environmental, Commerce and Management, Literary Research and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*

# कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास

**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड**
समाजशास्त्र विभागप्रमुख,शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
Email-eshwarlaxman@gmail.com

**सारांश:**

भारतात आदिवासी जमाती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि ब्रिटिशांनी १७८१ ला "गुन्हेगार जमाती कायदा" "Criminal Tribe Act" पास करून १९८ जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून घोषित केलेल्या जमातीपैकी एक आदिवासी जमात म्हणजे पारधी आदिवासी जमात होय. स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळातील समाजव्यवस्थेत भारतातील ज्या गुन्हेगार जमाती आहेत, त्या सर्व गुन्हेगार जमातींना उच्चभ्रू समाज व्यवस्थेकडून फार मोठ्या प्रमाणात शोषण केले जात असत. आजच्या एकविसाव्या शतकात देखील विकासाच्या केंद्रस्थानी पारधी आदिवासी जमातीला संधी मिळालेली नाही. म्हणून पारधी आदिवासी जमातीच्या सामाजिक मागासलेपणाच्या संदर्भात अध्ययन होणे गरजेचे आहे. त्या करीता कळंब तालुक्यातील पारधी आदिवासी जमातींच्या सामाजिक समस्यांचा संशोधनात्मक अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यासासाठी कळंब तालुक्यातील अनेक पारधी वस्तीवर प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या सामाजिक समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संशोधनात्मक अभ्यासातून त्यांच्या सामाजिक समस्यांचेचिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केले जाणार आहे.

**प्रस्तावना :**

ब्रिटिशांनी पारधी जमातीची ओळख ही गुन्हेगार जमाती म्हणून केली आहे. त्यामुळे या जमातीच्या लोकांना कोणत्याही क्षेत्रामध्ये चोरी अथवा दरोडे झाले असता पूर्णतः संशयाने या जमातींच्या लोकांकडे पाहिले जाते पोलीस प्रशासन असेल अथवा स्थानिक लोकांच्या माध्यमातून पारधी समाजाच्या वस्तीवर राहणाऱ्या लोकांना नियमितपणे सामाजिक शोषण व त्रासाला सामोरे जावे लागत असते. आजही या समाजाच्या अनेक सामाजिक समस्या आहेत. पारधी जमातीच्या प्रमुख समस्यांचा अभ्यास केल्यास हे लक्षात येते की, त्या लोकांना राहण्यासाठी स्वतःचे निवासस्थान नाही, बहुतांश पारधी समाजाची लोक पत्र्याचे घर व पाल मांडून राहतात कुटुंबासाठी असे कोणतेही उदरनिर्वाहाचे साधन त्यांच्याकडे उपलब्ध नसलेले दिसून येते. राहण्यासाठी स्वतःचा घरही नाही, सर्वाधिक दारिद्र्यरेषेखाली जगणारे कुटुंब या समुदायांमध्ये दिसून येतात निरक्षरतेचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर आहे. निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे कुटुंबातील मुले बाल वयात लग्न करून विभक्त कुटुंब तयार करून ते आई-वडिलांपासून वेगळे राहत असतात. बाल वयात लग्न करून विभक्त राहत असताना व्यसनाधीन देखील बनतात. पारधी समाजाच्या अशा अनेक सामाजिक समस्या आहेत, या सर्व समस्येतून पारधी समाजाचे निर्मूलन होणे अत्यंत गरजेचे आहे यासाठी प्रथमता उच्चभ्रू जाती समुदायाकडून त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे तसेच शासन आणि सरकारच्या माध्यमातून त्यांना कायमस्वरूपीचे विकसित करण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे दिसून येते.

उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्याचा पारधी जमातीचा सामाजिक समस्यांचा अभ्यास करीत असताना या जमातींच्या अनेक सामाजिक समस्याचा अभ्यास आजच्या २१ व्या शतकातील परिवर्तनाच्या दृष्टीने होणे गरजेचे आहे. भारतातील कोणत्याही राज्यातील तसेच महाराष्ट्र आणि इतर कोणत्याही जिल्ह्यात पारधी लोक राहत असलेले दिसून येतात. पारधी जमातीचे ब्रिटीश काळापासून ते आजपर्यंत सामाजिक शोषण तर केले जातेच, परंतु समग्र समाजव्यवस्थेत या जातींकडे उच्चभ्रू समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोण हा बदललेला नसून आजही पारधी जमातीच्या लोकांना सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे लागत असते. पारधी आदिवासी जमातीचे शोषण हे अनेक दशकापासून झालेले दिसून येते. म्हणून या जमातीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शोषणमुक्त करणे व त्यांच्या सामाजिक समस्याचे निर्मूलन होणे काळाची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. पारधी आदिवासी जमातीचा ऐतिहासिक संदर्भ समजून घेणे.
२. पारधी जमातीच्या सामाजिक समस्या समजून घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंध वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेऊन केला जाणार आहे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा अवलंब करण्यात आलेला आहे. प्राथमिक स्त्रोताच्या मुलाखत अनुसूची या तंत्राच्या साह्याने माहिती प्राप्त केलेली आहे. तसेच कळंब तालुक्यातील पारधी वस्तीला भेटी देऊन सामाजिक-सांस्कृतिक आणि शोषण करणाऱ्या व्यवस्थेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच पारधी जमातीचा पूर्वेतिहास व समकालीन समस्या व आव्हाने जाणून घेण्यासाठी द्वितीयक स्त्रोताचा अवलंब या संशोधनासाठी करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित, संदर्भग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, इत्यादी द्वितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे

प्रस्तुत शोधनिबंधात उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी आदिवासी जमातीच्या सामाजिक समस्यांचा अध्ययन केल्या जाणार आहे यामध्ये पारधी जमातीची ओळख, पारधी जमातीच्या सामाजिक मागासलेपणाच्या कारणांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जाणार आहे.

**पारधी जमाती - ओळख : पारध शब्दाचा अर्थ :**

विचारवंत एन्थोवेन यांच्या म्हणण्यानुसार, 'पारधी' ही संज्ञा 'पारध' या शब्दापासून आलेली आहे. हे पारध-पारधी स्त्री म्हणजे मृगया, शिकार करणे, अरण्यातील पशु, पक्षी इत्यादी धरणे-मारणे. परिधी म्हणजे फासा, पशु-पक्षी यांना फासा टाकून त्यांना मारून त्यावर उपजीविका करणारी जमात म्हणजे

Scanned by CamScanner

पारधी." म्हणजेच ही एक फिरस्ती जमात आहे. पारधी ही एक अशी जमात आहे कि, रानावनात पशुपक्ष्यांची शिकार करून जगणारी अशी भटके-विमुक्त जमात ही उस्मानाबाद जिल्ह्यातील एकमेव जमात आहे.

"पारध म्हणजे शिकार, पारध करणारा म्हणजेच शिकार करणारा. म्हणूनच पारधी असे त्यांचे नामकरण केले आहे. पारधी म्हणजेच रानावनात पशुपक्षांची शिकार करून जगणारा अशीच त्यांची व्याख्या केलीजाते."

**स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळातील पारधी जमात :**

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी ज्या काही भटक्या जमाती गुन्हेगार जमाती म्हणून तीन तारेच्या कुंपणात बंदिस्त केल्य होत्या त्यापैकीच पारधी ही एक जमात आहे. ज्याप्रमाणे पारधी जमातीला इंग्रज सरकारने नाकारले तसेच भारतीय समाजव्यवस्थेने हजारो वर्षांपासून माणूस म्हणून या जमातीला नाकारलेले आहे. यांच्यावर गुन्हेगारीचा शिक्का मारलेला आहे. त्यामुळे त्यांच्या मागे पोलिसांचा सतत ससेमिरा असतो त्यांच्या वस्तीवर कधी पोलिसांची धाड पडेल हे सांगता येत नाही. अशा प्रकारची ही देशातील एकमेव जमात म्हणता येईल. पारधी जमातीच्या गावगाड्याची कोणताही संबंध नाही इतर भटक्या प्रमाणे खास असा पारंपरिक व्यवसाय नाही, त्यामुळे गावगाड्याशी यांचा कोणताही संबंध आलेला नही.

स्वातंत्र्यानंतर गुन्हेगार जमातीच्या कायद्यात दुरूस्ती करण्यात आली असली तरी पारधी जमातीच्या बाबतीत तसे बदल झालेले नाही. काही ठिकाणी पारधी जमातीच्या लोकांना झालेल्या बदलाचा फायदे घेता आले नाही, तसेच त्यांना सोयी-सुविधा मिळाले देखील नाहीत. पारधी जमातीची मुख्य वस्ती ही महाराष्ट्रातील नाशिक, सोलापूर, बीड, उस्मानाबाद, लातूर, धुळे, जळगाव, अहमदनगर, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ इत्यादी जिल्ह्यांमध्ये त्यांची वस्ती असून महाराष्ट्रात इतरत्र ते तुरळक प्रमाणात वास्तव्य करीत असलेले दिसून येतात. अनुसूचित जमातीच्या महाराष्ट्राच्या या यादीत एकूण ४७ जमातींचा समावेश आहे. पारधी ही एक जमात या ४७ जमातीपैकीच आहे. या पारधी जमातीच्या अन्य पोटजाती देखील आहेत, यामध्ये पारधी ही जमात वेगळ्या ठिकाणी राहत असल्याने अर्थातच ते वेगळ्या नावाने ओळखले जातात. पारधी जमातीत फासेपारधी, गाय पारधी, वाघरी पारधी, हरण पारधी, टकारी टाकळकर पारधी, चित्ता पारधी, माकडवाले राज पारधी, गाव पारधी, पाल पारधी, भिल्ल पारधी, जंगल पारधी, लंगोटी पारधी, गोसावी पारधी, बंदरवाले पारधी, शिशी के तेलवाले पारधी असे पारद करण्याऱ्या साधनांच्या वरून त्यांचे पोटभेद करण्यात आलेले आहेत तसेच त्यांनी राहण्यासाठी निवडलेल्या निवारा यावरून त्यांना वेगळ्या नावाने ओळखले जाते.

**मराठवाडा व उस्मानाबाद जिल्यातील पारधी जमाती संदर्भात :**

स्वातंत्र्य आंदोलनात आपली त्यागाची भूमिका पार पाडणारा मराठवाडा विविध क्षेत्रातील विकासाच्या बाबतीत मागासलेलाच राहिला आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी अनेक क्षेत्रातील मागासलेपण मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात आजही आपणास दिसून येते, तसे पाहिले तर या मागासलेल्या परिस्थितीत उस्मानाबाद जिल्ह्यात विविध क्षेत्रात पारधी जमात आजही मागासलेलेच असल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्यातील कळंब तालुक्यातील पारधी जमाती देखील याला अपवाद नाही. कारण की, कळंब तालुक्यातील पारधी जमातीची सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, पारधी जमातीच्या अनेक समस्या आजही आहेत आणि पारधी जमातीचे लोक आजही सामाजिक समस्येच्या विळख्यात गुरफटूनपडलेल्या आहेत. म्हणून पारधी समाजाला सामाजिक समस्येतून मुक्त करणे काळाची गरज आहे.

पारधी जमातीचे लोक हे गावापासून दूर आणि जंगलाच्या परिसरात पिढ्यान पिढ्या उपजीविकेसाठी भटकत आहे, यासाठी सर्व कायदेशीर रस्ते बंद केले आहेत म्हणून आज तो चोरी करून जगतो आहे. त्यामुळेच तो गुन्हेगार म्हणून ठरलेला दिसतो आहे. परंतु देशात कोट्यावधी रुपयांची चोरी करणारे आज सुशिक्षित आणि प्रतिष्ठित लोक आहेत. आपल्या भौतिक गरजा पूर्ण झालेले असताना देखील लाच आणि भ्रष्टाचार याद्वारे लाखो रुपये मिळणारे मात्र गुन्हेगार समजले जात नाहीत. परंतु पोटासाठी पंधरा ते वीस रुपयाची चोरी करणारे मात्र गुन्हेगार समजले जातात. नव्हे तर जन्मताच पारधी जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारलेला असतो. एवढेच नव्हे तर त्यांचे माणूस म्हणून सर्वच हक्क हिरावून घेतलेले असतात. गावकुसाबाहेर पशु सारखे, विकासापासून कायम तुटलेली, साधनही नसणारी आणि भयावह जीवन जगत असलेली भारतातील ही एकमेव जमात मानता येईल.

महाराष्ट्रातील मराठवाडा हा प्रादेशिक विभाग तसे पाहिले तर मागासलेला म्हणूनच परिचित आहे. मराठवाड्यातील समाजजीवन हे नानाविध जाती-जमातीने एकवटलेला आहे. परंतु यामध्ये मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्याचे जीवनमान खूपच मागासलेले आहे. निजामाने मराठवाड्याच्या सामाजिक जीवनाची कोंडी केलेली होती. सामाजिक जीवनही शोषितच होते. असेच सामाजिक शोषण व शोषित जीवन हे पारधी जमातीच्या लोकांचे असल्याचे आपल्याला दिसून येत आहे.

**पारधी जमातीच्या सामाजिक समस्या व विश्लेषण :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील जवळ जवळ प्रत्येक तालुक्यात पारधी जमातीचे लोक राहतात. पारधी जमातीच्या लोकांचे सर्वच जिल्ह्यात आणि तालुक्यात फार मोठ्या प्रमाणात शोषण केले जातात. पारधी जमातीच्या परिवर्तनासाठी आणि विकासासाठी तसे कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत. स्वतःच्या स्वार्थासाठी सर्व सत्ताधीश व प्रभूत्वशाली जाती हे पारधी जमातीचे पाहिजे तसे वापर करून घेतात. त्यांना कोणत्याही प्रकारची संधी देऊ शकत नाही अथवा मिळालेल्या संधीचा त्यांना फायदा देखील घेऊ दिले जात नाही. खरेतर या समाजामध्ये पारंपारिक विचार आणि शिक्षणाच्या बाबतीत मागासलेपणा असल्यामुळे इतर लोक यांचा पुरेपूर फायदा घेतात.

कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या सामाजिक समस्याचा अभ्यास करताना कळंब तालुक्यातील १० पारधी वस्ती तथा पिढीवर भेट देऊन मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने तथ्य संकलित करण्यात आले आहे. कळंब तालुक्यात मोहा, शेळका धानोरा, आंदोरा, कन्हेरवाडी, घोगावास्ती, महादेव वस्ती, खामसवाडी, तेरखेडा, कसबे तडवळा, कोथाळवाडी, वाकडी, दशमेगाव, येरमाळा, वाघोली, खामकरवाडी, देवधानोरा, मंगरूळ, डिकसळ, भाटसांगवी, कोथळा, शिरढोण, जवळा खुर्द, एकुरगा अशा अनेक वस्ती पारधी जमातीच्या कळंब तालुक्यात असल्याचे दिसून येतात.

Scanned by CamScanner

पारधी पिढीतील १०० लोकांची माहिती घेत असताना यामध्ये त्यांचे वय वैवाहिक स्थिती व शैक्षणिक स्तर अभ्यासले असता, असे लक्षात येते की, कमी वयात विवाह केलेले कुटुंब प्रमुख जास्त असून यामध्ये ८५ कुटुंब प्रमुख हे विवाहित आहेत आणि इतर ०५ अविवाहित, ०६ विधवा आणि ०४ हे घटस्फोटीत असे १०० कुटुंबाची माहिती घेतली या अभ्यासात घेतली आहे. या मध्ये २० वर्षाखालील कुटुंब प्रमुख हे २४ होते, २१-३० वर्षातील कुटुंब प्रमुख हे ३० होते, ३१-४० वर्षातील कुटुंब प्रमुख हे २० होते, ४१-५० वर्षातील कुटुंब प्रमुख हे १२ होते, ५१-६० वर्षातील कुटुंब प्रमुख हे ०८ होते, ६१ वर्षापुढील कुटुंब प्रमुख हे०६ आहेत. पारधी जमातीच्या कुटुंबाच्या माहिती वरून हे स्पष्ट होते की, साक्षरतेपेक्षा निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. जवळपास ६२ उत्तरदाते हे पूर्णपणे निरक्षर होते तर उर्वरीत ३८ हे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण घेतलेले होते.

कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या प्रत्यक्ष केलेल्या अभ्यासावरून असे लक्षात येते की, आजही या जमातीतील अनेक कुटुंबांना स्वतःचे राहण्यासाठी घर नाही, ज्यांचे आहे त्यांचे घर देखील व्यवस्थित नाहीत अशी अत्यंत हलाखीची परिस्थिती या जमातीची असल्याचे दिसून येते. आजही अनेक पारधी कुटुंब हे उघड्यावर असलेले दिसून येते. २१ व्या शतकात देखील या जमातीचे कोणत्याही प्रकारचा विकास झालेला नाही. पारधी जमातीतील काही कुटुंबांनी अतिक्रमण जागेवर तर काहींनी गावाच्या जवळ पडीक जागेवर घरे तयार करून पारधी वस्ती निर्माण केली आहे. तसेच पारधी जमातीतील काही कुटुंब हे स्वतःच्या असलेल्या शेतीत घर बांधून राहत असलेले दिसून आले अन्य पारधी कुटुंबांना आजही गावकुसाबाहेर अतिक्रमण जागेवर, पडीक जागेवर तात्पुरत्या स्वरूपाचे पाल तथा पत्र्याचे शेड बांधून राहावे लागत आहेत.

**पारधी जमातीच्या कुटुंबाच्या निवासस्थानाचे स्वरूप दर्शविणारी माहिती**

| अ. क्र. | निवासस्थानाचे स्वरूप | निवेदक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कच्चे निवासस्थान असलेले कुटुंब | १७ | १७% |
| २ | अर्धे पक्के निवासस्थान असलेले कुटुंब | १३ | १३% |
| ३ | पालाचे निवासस्थान असलेले कुटुंब | १२ | १२% |
| ४ | झोपडीचे निवासस्थान असलेले कुटुंब | ०६ | ६% |
| ५ | पत्र्याचे निवासस्थान असलेले कुटुंब | ४७ | ४७% |
| ६ | इतर निवासस्थान असलेले कुटुंब | ०५ | ५% |
| एकूण निवेदक आणि टक्केवारी | | १०० | १००% |

स्रोत : मुलाखत अनुसूचीच्या आधारे मिळालेली माहिती.

कळंब तालुक्यातील १०० पारधी कुटुंबांचा अभ्यास करताना त्याच्यानिवासस्थानाचे स्वरूप हे वेगवेगळ्या स्वरूपाचे असल्याचे दिसून आले. यामध्ये, कच्चे निवासस्थान असेलेले कुटुंब हे १७ आहेत, अर्धे पक्के निवासस्थान असेलेले कुटुंब हे १३ आहेत, पालाचे निवासस्थान असेलेले कुटुंब हे १२ आहेत, झोपडीचे निवासस्थान असेलेले कुटुंब हे ०६ आहेत, पत्र्याचे निवासस्थान असेलेले कुटुंब हे ४७ आहेत, इतर निवासस्थान असेलेले कुटुंब हे ०५ आहेत. यावरून हे लक्षात येते की, मुळातच या लोकांना प्रस्थापित लोकांनी कोणत्याही गावात प्रवेश दिलेला नाही ज्या काही पारधी वस्ती आज अस्तित्वात आहेत, त्या गावाच्या बाहेर पडीक, अतिक्रमण, शासनाच्या जागेवर तात्पुरत्या स्वरूपाचे घर तयार करून राहत असलेल्या दिसून येतात. पारधी वस्ती वरील कुटुंबाच्या निवासस्थानाचे स्वरूप मात्र फारच दयनीय असल्याचे स्पष्ट होते

**पारधी जमातीतील बालविवाह आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी माहिती**

| अ. क्र. | बाल विवाहाचे तपशील | पारधी जमातीतील बालविवाहाचे प्रमाण | बालविवाह कायद्याविषयी माहिती असणारे निवेदक |
|---|---|---|---|
| १ | होय | ४७ | २२ |
| २ | नाही | ३० | ५८ |
| ३ | काही प्रमाणात | २३ | २० |

स्रोत : मुलाखत अनुसूचीच्या आधारे मिळालेली माहिती.

उपरोक्त तक्त्यातील माहिती वरून असे स्पष्ट होते की, पारधी जमातीत बालविवाह होतात असे म्हणणारे हे ४७ लोक आहेत तर बालविवाह होत नाहीत असे म्हणणारे ३० लोक आहेत तसेच २३ लोक हे काही प्रमाणात बालविवाह होतात असे म्हणणारे आहेत. याच लोकांना बालविवाह प्रतिबंधक कायदा माहिती आहे का, असे विचारले असता, यापैकी २२ लोकांनी माहिती आहे असे म्हटले तर५८ लोकांनी कायद्याविषयी काहीही माहिती नाही असे स्पष्ट सांगितले. २३ लोकांना काही प्रमाणात माहिती आहे, असे निदर्शनास आले. यावरून पारधी जमातीच्या सामाजिक समस्या कशा आणि किती गंभीर स्वरूपाच्या आहेत हे लक्षात येते.

पारधी जमातीतील बालविवाह प्रथा ही जमातीसाठी अधोगतीचे लक्षण असल्याचे स्पष्ट दिसून येते. कारण बाल वयात लग्न होत असल्यामुळे त्या कुटुंबातील मुला-मुलींचे शिक्षण पूर्णपणे बंद केले जाते आणि त्यांना वैवाहिक जबाबदारी कमी वयात दिले जाते. त्यामुळे तो कुटुंब सर्व बाबतीत विकसित होऊ शकत नाही. या जमातीतील लोकांना बालविवाह प्रतिबंधक कायदाचीकोणत्याही स्वरुपाची माहिती नसते. काही लोकांना माहिती असेल तरी ते मनावर लागून घेत नाहीत. म्हणून त्या जमातीतील कोणत्याही कुटुंबावर बालविवाह प्रतिबंधक कायद्याचा परिणाम होत नाहीत परंतु ज्या कुटुंबातील

Scanned by CamScanner

सदस्य थोड्या फार प्रमाणात शिक्षित असेल तर ते बाल विवाहाला विरोध करतात, आणि इतर नातेवाकांना देखील बालविवाह पासून रोखण्याचे प्रयत्न करतात.

कळंब तालुक्यातील पारधी जमातीचे लोक हे गाव पारधी म्हणून समाजात वावरत असताना दिसून येतात. या पारधी जमातीत मुला-मुलींच्या विवाहाच्या वेळी वय लक्षात घेतले जाते का? असे विचारले असता, ३८ लोकांनी होय असे सांगितले तर६२ लोकांनी नाही असे उत्तर दिले. गाव पारधी जमातीत हुंडा देणे – घेणे या प्रथेला मान्यता असून मुलीच्या लग्नात वधूमुल्य हे वर पक्षाला देण्यासंदर्भात समाज मान्यता असल्याचे स्पष्ट दिसून आले. बदलत्या काळानुसार या जमातीतील हुंडा प्रथेत पाहिजे तसे बदल झालेले नाही. कोणत्याही कुटुंबात विवाह होत असेल तर हुंडा मात्र कमी-अधिक असेल तरी चालेल, परंतु हुंडा देणे हे मानसन्मानाचे मानले जाते. त्यामुळे ही प्रथा गाव पारधी जमातीत पारंपारिक ते आधुनिक समाजात देखील आहे. म्हणून असे म्हणता येईल, जोपर्यंत या समाजातील अनिष्ट प्रथा- परंपरा नष्ट होत नाही, तोपर्यंत या जमातीच्या सामाजिक समस्या निर्मूलन होणार नाही. या करिता सर्व स्तरातून प्रयत्न केले तर निश्चितच परिवर्तन होवू शकेल.

**निष्कर्ष :**

भारत आणि महाराष्ट्रात वेगवेगळ्या पारधी जमातीचे लोक राहतात. महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्यात गाव पारधी जमातीचे लोक फार मोठ्या प्रमाणात राहत असल्याचे दिसून येते. या जमातीचे मागासलेपणाची प्रमुख कारणामध्ये निरक्षरता आणि व्यसनाधीनता असल्याचे स्पष्ट झाले आहे. या जमातीतील कोणत्याही कुटुंबातील जास्तीत जास्त सदस्य हे दारू व इतर व्यसन दैनंदिन जीवनात नियमितपणे करतात. त्यामुळे त्याच्या कुटुंबात पाहिजे तसे वातावरण राहत नाही, म्हणून त्यांचे मुल देखील बिघडतात आणि शिक्षणापासून वंचित राहण्याचे प्रमाण वाढत जाते. म्हणून या जमातीच्या लोकांनी व्यसनापासून अलिप्त राहून स्व: कुटुंब विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे आणि इतर सर्व स्तरातून पारधी जमातीच्या सामाजिक समस्या आणि मागासलेपणाची सर्व कारणे कमी करण्यासाठी तसेच विकासाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. पारधी जमातीत जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रथम अनिष्ट प्रथा-परंपरा कमी करणे गरजेचे आहे. यासाठी जमातीतील लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन करण्यास भाग पाडणे गरजेचे आहे. असे चित्र जेव्हा पारधी जमातीत निर्माण होतील तेव्हाच हा समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करीत असलेला दिसून येईल.

**संदर्भग्रंथ:**

१. गारे गोविंद (२०००), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती (सामाजिक व सांस्कृतिक मागोवा), कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.
२. केजकर पि. डी. (अनुवाद) ( २००४), भारताची राष्ट्रीय संस्कृती, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली.
३. जाधव रमेश (२००३), भटक्या विमुक्तांचे परिप्रेक्ष, हरनाई प्रकाशन, नांदेड
४. राठोड मोतीराज (२०१२), गुन्हेगार जमाती कायदा आणि परिणाम, निर्माण संस्था, अश्मक प्रकाशन पुणे-औरंगाबाद
५. आगलावे प्रदीप (२०१५), सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
६. एस कुमार (२००९), आदिवासी संस्कृति एवं राजनीति, विश्वभारती पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
७. राठोड गणपत (२०१५), घुमंतू जनजातियो का सांस्कृतिक अध्ययन, पूजा पब्लिकेशन, कानपुर.
८. पवार दिपक (२०१४) पारधी समाजाचे अंतरंग श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
९. चव्हाण रामनाथ (२००८) भटक्या विमुक्तांची जात पंचायत, देशमुख आणि कं. पुब्लीशर्स, पुणे.

Scanned by CamScanner